मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# थकबाकीदारांविरोधात महापालिकेची कडक कारवाई सुरु

## मालमत्ता कर थकविणाऱ्यांच्या विरोधात कठोर भूमिका घेण्यास सुरूवात

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने मालमत्ता कर थकविणाऱ्यांच्या विरोधात कठोर भूमिका घेण्यास सुरुवात केली आहे. मालमत्ता कर थकविणाऱ्या मालमत्ताधारकांना नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत. थकबाकीदारांना वारंवार आवाहन करूनही ज्यांनी अद्याप थकीत कर भरणा केला नाही, अशा मालमत्ता जप्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच थकबाकीदार मालमत्तांचे नळ कनेक्शन खंडित करण्यात येणार आहे. तरी थकबाकीदारांनी आपल्या कराचा तात्काळ भरणा करून जप्तीची कटू कारवाई टाळावी. ज्यांचा कर थकीत आहे, त्यांनी तत्काळ कराचा भरणा करावा, असे आवाहन कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी केले आहे.




शहरात ५० हजारांपेक्षा अधिक थकबाकी असणारे २५,१३० मालमत्ताधारक आहेत, तर ५ लाखांपेक्षा जास्त थकबाकी असलेले ७८४ मालमत्ताधारक आहेत. कर संकलन विभागाच्या १८ कार्यालयांमार्फत थकबाकीदारांना नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत.

**धनादेश न वटलेल्या मालमत्ताधारकांची मालमत्ता सील**

ज्या मालमत्ताधारकांचे धनादेश वटले नाहीत, त्यांना वारंवार सूचना देऊनही रक्कम भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या मालमत्ताधारकांविरोधात महापालिकेने कडक कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. महापालिकेच्या कारवाई पथकाने अशा मालमत्ता जप्त करण्यास सुरुवात केली आहे. कर संकलनासाठी महापालिकेची शहरात १८ ठिकाणी विभागीय कार्यालये आहेत. कर संकलन मोहिमेसाठी विभागाकडून गट लिपिक, सहायक मंडलाधिकारी यांच्याद्वारे नागरिकांना टेलीकॉलिंग करून कर भरण्याचे आवाहन देखील करण्यात येत आहे.

### सर्वाधिक थकबाकीदार थेरगावमध्ये

» सर्वाधिक १४,०६२ थकबाकीदार थेरगावमध्ये असून, त्यानंतर चिखली ११,३९५, चिंचवड परिसरात ९,६४२, सांगवी ८,५०७, भोसरी ७,३९६, किवळे ६,६२५, निगडी प्राधिकरण ६,१७६, मोशी ६,१०६, मनपा भवन ५,९७८, पिंपरी वाघेरे ४,९९९, वाकड ४,९६२, कस्पटे वस्ती ४,८६५, आकुर्डी ४,४९३, चऱ्होली ३,७४६, दिघी-बोपखेल ३,६१८, फुगेवाडी-दापोडी ३,४६८, तळवडे २,९०५, पिंपरी नगर २,६१५.

“ पिंपरी चिंचवड शहरातील मोठ्या प्रमाणावर थकीत मालमत्ता कराच्या वसुलीसाठी कारवाई सुरु केली आहे. नागरिकांना वेळोवेळी आवाहन, नोटिसा आणि दूरध्वनीद्वारे सूचनाही देण्यात आल्या. तरी देखील अनेक थकबाकीदारांकडून प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे नळजोडणी तोडणे, मालमत्ता जप्ती करणे, अशी कठोर कारवाई सुरु करण्यात आलेली आहे. तरी मालमत्ता कराचा भरणा करून जप्ती व दंडात्मक कारवाई टाळावी.

- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्यामुळे सोसाटीधारकांना दिलासा!

## नाशिक फाटा ते खेड कोंडी सोडवण्यासाठी पाठपुरावा करणार; संजीवन सांगळे यांची प्रतिक्रिया

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील तसेच हिंजवडी आयटी पार्क या भागात या पावसाळ्याच्या दिवसांमध्ये उद्भवलेल्या ट्रॅफिकच्या समस्येबाबत तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत सोसायटी फेडरेशन आणि हिंजवडी आणि पिंपरी-चिंचवड शहरातील स्वयंसेवी संस्थांची बैठक आयोजित करावी, अशी विनंती आमदार महेश लांडगे यांना फेडरेशनने पत्राद्वारे केली होती. त्याला मुख्यमंत्री फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यामुळे सोसायटीधारकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे, अशी प्रतिक्रिया पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी व्यक्त केली आहे.

शहरातील सर्वच भागातील सोसायटीधारक नागरिक, हिंजवडी आयटी पार्क या भागामध्ये नोकरी व्यवसाय निमित्त जात असताना त्यांना तासाने तास ट्राफिक मध्ये अडकून पडण्याचा भयंकर त्रास होत असल्याबाबत मुख्यमंत्री महोदयासमोर व्यथा मांडल्या. त्याचप्रमाणे ही वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना करण्याची विनंती देखील केली.



चांदणी चौक या ठिकाणी पाठीमागे निर्माण झालेल्या ट्राफिकच्या समस्येवर देशाचे रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी एनएचएआय याची एक टीम तयार करून या टीमने तयार केलेल्या अहवालातील त्रुटी दूर करण्यासाठी आयआयटी मुंबई यांची मदत घेऊन ज्याप्रमाणे प्रपोजल तयार केले होते. त्याच धरतीवर पिंपरी-चिंचवड शहरातील या सर्व ट्राफिकच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी काही करता येईल का? याबद्दल मीटिंगमध्ये लक्ष वेधले. तसेच इतर काही तत्कालिक आणि कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात याबद्दल विनंती आणि उपाय सुचवले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आमच्या शिष्टमंडळाच्या सर्व मागण्या आणि उपाय ऐकून घेऊन मीटिंगमध्ये उपस्थित असलेल्या सर्व अधिकाऱ्यांना योग्य ते सूचना देऊन यावर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

“ महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये सर्वप्रथमच एखाद्या शहरातील स्वयंसेवी संस्थांना एखाद्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी, उपाययोजना आणि चर्चा करण्यासाठी बोलवल्याची ही घटना आहे. आता नाशिक फाटा त्याचप्रमाणे देहू, आळंदी रोड, चिखली भागातील रोडवरील ही वाहतूक समस्या सोडवण्यासाठी ‘अॅक्शन प्लॅन’ तयार करावा, अशी अपेक्षा आहे.

- संजीवन सांगळे, अध्यक्ष, पिंपरी चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशन.

तसेच, नाशिक हायवेवरील चाकण, खेड त्याचप्रमाणे निगडी, चिखली मोशी या परिसरातील ट्राफिक समस्या सोडवण्यासाठी देखील कायम स्वरुपी उपाययोजना करण्याकरिता रस्ता रुंदीकरणाचे काम प्राधान्याने हाती घ्यावे, अशी विनंती मुख्यमंत्री यांना केली आहे.

# गिरीश प्रभुणे यांना समाजसेवेत ईश्वर दिसला

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भैय्याजी जोशी यांचे गौरवोद्गार; 'जसे कळले तसे' या ग्रंथाचे प्रकाशन



**पुणे | प्रतिनिधी**

'विचारांची भिन्नत असतानाही वेगवेगळ्या लोकांसोबत गिरीश प्रभुणे यांनी काम केले. त्यांची समाजाशी भक्ती आहे. त्यांनी समाजाला ईश्वर मानले. त्यांना समाजसेवेत ईश्वर दिसला. फळ मिळणारच आहे अशा विश्वासाने कर्म मार्गावर त्यांनी वाटचाल केली. त्यांचे कार्य एक तप, साधना, व्रत आहे. अंतःकरणातील ईश्वराच्या बळावर त्यांनी आदर्श काम केल्याचे' गौरवोद्गार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भैय्याजी जोशी यांनी काढले.

क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीचे अध्यक्ष, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त शनिवारी आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यात ते बोलत होते. जोशी यांच्या हस्ते प्रभुणे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी रवींद्र भोळे लिखित गिरीश प्रभुणे 'जसे कळले तसे' या ग्रंथाचे प्रकाशन झाले. चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात झालेल्या कार्यक्रमाला अरुंधती प्रभुणे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्राचे प्रांत संघचालक नानासाहेब जाधव, पद्मश्री रमेश पतंगे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार शंकर जगताप, उमा खापरे, अमित गोरखे, भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, महापालिका आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, डॉ.सुनिल भंडगे, क्रांतीवीर चापेकर स्मारक समितीचे कार्यवाह ॲड सतिश गोरडे, कोषाध्यक्ष रवी नामदे यावेळी उपस्थित होते.

भैय्याजी जोशी म्हणाले, 'चाकोरीवर, मळलेल्या वाटेवर चालणे सोपे असते. अंधारात उडी घेऊन साहशी काम करण्याचे कार्य गिरीश प्रभुणे यांनी केले. प्रकाश आहे हा विश्वास ठेवून त्यांनी काम केले. विचारांची भिन्नत असतानाही वेगवेगळ्या लोकांसोबत काम केले. त्यांची समाजाशी भक्ती आहे. त्यांनी समाजाला ईश्वर मानले. त्यांना समाजसेवेत ईश्वर दिसला. फळ मिळणारच आहे अशा विश्वासाने कर्म मार्गावर त्यांनी वाटचाल केली. समाजाचे प्रश्न बघण्यासाठी अंतकरणातून लागणारी दृष्टी त्यांच्याकडे आहे. प्रश्नांचे अध्ययन, सखोल मांडणी करून समाज सुधारण्यासाठी मन गुंतावे लागते. काय केले पाहिजे हे प्रभुणे यांना समजले. त्यातून यमगरवाडीचा प्रकल्प उभारला. समाजातील वाटचाल करण्यासाठी संकल्प असलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे. काम करताना अनेकदा ठेच लागली. प्रत्येक ठेच त्यांना पुढे जाण्याची दिशा देत गेली. त्यांचे कार्य एक तप, साधना, व्रत आहे. अंतःकरणातील ईश्वराच्या बळावर त्यांनी आदर्श काम केले. प्रामाणिक आणि निष्ठेने काम केल्याने त्यांना साधना आणि सहयोग मिळाला. भटके, विमुक्त यांच्या जीवनात बदल, समाजाच्या मुख्य प्रवाहाच्या कामात आणण्याचे काम त्यांनी केले. पुढील वाटचाल अशाच प्रकारची रहावी'.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, 'गेली अनेक वर्षे गिरीश प्रभुणे हे वंचित घटकांतील मुलांची सेवा करीत आहेत. पारधी समाजातील मुलांना शिक्षण देऊन मुख्य प्रवाहात आणले जात आहे. त्यांच्या कामांची तुलना कोणाशीच होऊ शकत नाही. प्रभुणे यांच्या मागणीनुसार केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून क्रांतीवीर चापेकर यांच्या नावाने टपाल तिकीट काढले. चापेकर वाडा दुरुस्तीसाठी स्थायी समिती अध्यक्ष असताना १८ कोटी रुपयांचा निधी दिला. प्रभुणे यांच्या प्रयत्नामुळे चापेकरवाडा विकसित करण्यात आला आहे. प्रभुणे यांचे काम पुढील पिढीसाठी प्रेरणादायी आहे'. आयुक्त शेखर सिंह म्हणाले, 'पुनरुत्थान समरसता गुरुकुलममध्ये वंचित घटकांतील मुलांना कौशल्यपूर्ण शिक्षण दिले जात आहे. पारधी समाजाचे मुले शिक्षणामुळे समाजाच्या मुख्य प्रवाहात येत आहेत. गिरीश प्रभुणे यांच्या कामाचा प्रवाह नदीप्रमाणे आहे'.

सत्काराला उत्तर देताना गिरीश प्रभुणे म्हणाले, 'समाजातील, तळागाळातील भटके, विमुक्त लोकांची सेवा करण्याची जबाबदारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने माझ्याकडे दिली. पारधी समाजामध्ये काम करणे अतिशय जिकरीचे आहे. या समाजातील मुलांना सरकारी, खासगी शाळेत प्रवेश दिला जात नव्हता. ही कामाची सुरुवात आहे. आणखी खूप कामे करायची आहेत. या कामात अनेकांनी मदत केली तर अनेकांनी अडथळेही आणले. स्वयंसेवकच्या शाखा निधी गोळा करून गुरुकुलम, यमगरवाडीसाठी देतात. त्यामुळे हे काम करणे शक्य झाले आहे. यमगरवाडीतील शाळेत शिक्षण घेतलेली अनेक मुले, मुली मोठे अधिकारी, उच्च शिक्षित झाले. नगरसेवक झाले. मी तरुण वयात उनाडक्या करीत होतो. मात्र, संघ शाखेमुळे चांगल्या कामात आलो. ७५ वर्षे झाली असली तरी शेवटपर्यंत समाजासाठी काम करीत राहणार आहे'.

पद्मश्री रमेश पतंगे, आमदार शंकर जगताप, यमगरवाडीच्या प्रकल्पातील माधवराव गायकवाड, ललिता जाधव यांनीही शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. डॉ.सुनिल भंडगे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.दिगंभर ढोकले यांनी सूत्रसंचालन केले. तर, संजय तांबट यांनी आभार व्यक्त केले.

# वारंवार वीज खंडित होण्याच्या समस्येवर तात्काळ उपाययोजनेची करा

## महावितरणचे उपअभियंता राजेश भगत व स्वी सदस्य दिनेश यादव यांनी प्रत्यक्ष जागेवर येऊन पाहणी



**पिंपरी | प्रतिनिधी**

कुदळवाडीतील बालघरे वस्तीमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या वारंवार वीज खंडित होण्याच्या समस्येबाबत स्थानिक नागरिकांच्या वतीने महावितरणकडे निवेदन देण्यात आले. या निवेदनाची गंभीर दखल घेत महावितरणचे उपअभियंता श्री. राजेश भगत व स्वी सदस्य दिनेश यादव यांनी प्रत्यक्ष जागेवर येऊन पाहणी केली.

या पाहणीदरम्यान महिला भगिनींची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. त्यांनी प्रत्यक्ष अधिकाऱ्यांसमोर आपल्या अडचणी मांडल्या व वीजपुरवठा सुरळीत करण्यात यावा, अशी मागणी केली.

निवेदनात वस्तीतील वारंवार वीज खंडित होणे, कमी दाबाने वीज येणे, अचानक ट्रिपिंग अशा समस्यांकडे लक्ष वेधून घेतले गेले. यामुळे विद्यार्थ्यांचे अभ्यास, लघुउद्योग आणि दैनंदिन घरगुती कामांवर परिणाम होत असल्याचे सांगण्यात आले.

या वेळी जंयवत बालघरे, उत्तम बालघरे, सागर बालघरे, अनिकेत लांडगे, धनपत यादव, दीपक घन, स्वराज पिजण, रोहिदास वाघमारे,विशाल बनसोडे यांसह अनेक नागरिक उपस्थित होते.

महावितरण अधिकारी राजेश भगत यांनी लवकरात लवकर आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन नागरिकांना दिले. स्थानिकांनी त्यांच्या या तत्परतेबद्दल समाधान व्यक्त केले असून, लवकरच या समस्येचे समाधान होईल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# पिंपरी चिंचवडकरांसाठी खुशखबर ! आता व्हॉट्सअपवर पार्किंग सेवा सुरु

## 'पार्किंग पाल'च्या माध्यमातून शहरातील दहा ठिकाणी उपलब्ध करून देणार सुविधा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुण्यासह पिंपरी चिंचवडलादेखील वाहतूक कोंडीचे ग्रहण लागले आहे. शहरातील अनेक प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासकीय स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. मात्र या प्रयत्नांपेक्षा वाहतुकीच्या समस्येत वाढ होण्याचा वेग अधिक आहे. अशातच पिंपरी चिंचवड महापालिकेने शहरवासीयांसाठी मोठा निर्णय घेत दिलासा दिला आहे.

वाहतुकीच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी महापालिकेने डिजिटल सेवा सुरु केली आहे. त्यामुळे आता वाहनचालकांना पार्किंगसाठी पावती फाडण्यसाठी रस्त्यामध्ये थांबावे लागणार नाही. "पे अँण्ड पार्क" या उपक्रमांतर्गत "व्हॉट्सअॅप पार्किंग" ही डिजीटलसेवा महापालिकेने सुरु केली आहे.

शहरातील वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून मिळालेल्या माहितीनुसार २० लाखाहून अधिक वाहने आहेत. यामुळे वाहतूक कोंडी, गैरसोयी अणि इंधन वाया जाणे अशा समस्या वाढत आहेत. या समस्येची गंभीर दखल घेत महापालिकेने सशुल्क पार्किंग धोरण राबवले असून सध्या शहरातील दहा ठिकाणी ही अंमलबजावणी सुरु केली आहे.

"व्हॉट्सअॅप पार्किंग" या सुविधेचा लाभ घेण्यासाठी ८३२४९२५९३४ या व्हॉट्सअप क्रमांकावर हाय असा मेसेज पाठवावा लागेल. त्यानंतर नागरिकांना आगाऊ नोंदणी करता येणार आहे. त्यानंतर संबंधीत प्रक्रियेची सविस्तर माहिती मिळते. पैसे भरण्यासाठी स्कॅन कोड पाठवला जातो. त्या वेळेसाठी जागा आरक्षित केली जाते. जर वाहन ठरलेल्या वेळेत पार्क केले नाही तर ती जागा दुसऱ्या वापरकर्त्यासाठी खुली होते.

पिंपरी-चिंचवड महापालिका व स्मार्ट सिटी अंतर्गत शहरातील दहा ठिकाणी स्मार्ट पार्किंगमध्ये 'पे अॅण्ड पार्क' सुरु करण्यात येणार आहे. हे काम "पार्किंग पाल" या स्टार्टअप एजन्सीला देण्यात आले आहे.



### तर "व्हॉट्सअॅप पार्किंग" या सुविधेचा लाभ कसा

» "व्हॉट्सअॅप पार्किंग" या सुविधेचा लाभ घेण्यासाठी ८३२४९२५९३४ या व्हॉट्सअप क्रमांकावर हाय असा मेसेज पाठवावा लागेल. त्यानंतर नागरिकांना आगाऊ नोंदणी करता येणार आहे. त्यानंतर संबंधीत प्रक्रियेची सविस्तर माहिती मिळते. पैसे भरण्यासाठी स्कॅन कोड पाठवला जातो. त्या वेळेसाठी जागा आरक्षित केली जाते. जर वाहन ठरलेल्या वेळेत पार्क केले नाही तर ती जागा दुसऱ्या वापरकर्त्यासाठी खुली होते.या उपक्रमात व्हाट्सअप, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व ब्लॉकचेन सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना जवळपासच्या उपलब्ध पार्किंग जागा शोधणे सुलभ होणार आहे. ही योजना महाराष्ट्र राज्य शासनाच्या ई-गव्हर्नन्स अंतर्गत मुख्यमंत्री १५० दिवस कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आलेली आहे.

### तर ती दहा ठिकाणे कोणती?

» निगडीतील कै. मधुकर पवळे उड्डाणपूल
» भक्ती-शक्ती
» नाशिक फाटा
» एम्पायर इस्टेट उड्डाणपूल
» चिंचवड गावातील चापेकर चौक
» पिंपळे सौदागर येथील अर्बन स्ट्रीट
» स्पॉट १८ परिसरातील ठिकाणांचा समावेश आहे.

### शुल्क दर काय आहेत?

» दुचाकीसाठी एका तासाला पाच रुपये
» चारचाकीसाठी एका तासाला दहा रुपये
» रिक्षा व टेम्पोसाठी १५ रुपये
» बससाठी एका तासाला ५० रुपये
» दररोज वाहन उभे करणाऱ्यांसाठी मासिक पास सुविधेचा नियोजन सुरु असून पासधारकांना २० ते ३० टक्के सवलत दिली जाणार आहे.

# ऑनलाइन मालमत्ता कर भरणाऱ्यांना मिळणार 4 टक्के सवलत

## कारवाईमध्ये सातत्य ठेवा अन्यथा निलंबनाची कारवाई केली जाईल, असे आदेश महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेचा मालमत्ता कर १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ याकाळात ऑनलाइन भरल्यास मालमत्ताधारकांना सामान्य करावर ४ टक्के सवलत मिळणार आहे. ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप मालमत्ता कर भरला नाही, त्यांनी तात्काळ तो भरून या सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेने आर्थिक वर्ष २०२५-२६ चा मालमत्ता कर ३० जून २०२५ पूर्वी ऑनलाइन कर भरणाऱ्यांना १० टक्के सवलत महापालिकेच्या वतीने देण्यात आली होती. या सवलतीचा लाभ तब्बल ३ लाख ३७ हजार मालतमत्ताधारकांनी घेतला आहे. ज्या मालमत्ताधारकांना या सवलतीचा लाभ घेता आला नाही,त्यांनी ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत मालमत्ता कर ऑनलाइन भरल्यास आता ४ टक्के सवलतीचा लाभ घेता येईल.

पिंपरी चिंचवड महापालिकेकडून ऑनलाइन मालमत्ता कर भरणाऱ्यांना देण्यात येणाऱ्या सवलतीमुळे ऑनलाइन कर भरणाऱ्यांची संख्या वाढत आहे. गेल्या सहा वर्षातील पहिल्या तिमाहित ऑनलाइन कर भरणाऱ्यांची संख्येवरून ते स्पष्ट होत आहे. आर्थिक वर्ष २०२० - २१ च्या पहिल्या तिमाहित ऑनलाइन कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांची संख्या ८८ हजार ९०, आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये १ लाख ११ हजार १, आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये १ लाख २८ हजार १५ , आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये २ लाख ९ हजार ६२५, आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये २ लाख ६० हजार ७५७ तर आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या पहिल्या तिमाहित ऑनलाइन कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांची संख्या ३ लाख ३७ हजार एवढी आहे.




> कर संकलन प्रक्रियेत पारदर्शकता, कार्यक्षमता वाढवण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. ऑनलाईन कर भरणाऱ्यांची वाढती संख्या ही नागरिकांचा महापालिकेवरचा विश्वास दर्शवते. तथापी ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप मालमत्ता कर भरला नाही, त्यांनी तात्काळ ऑनलाइन कर भरून ४ टक्के सवलतीचा लाभ घ्यावा.
> - प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, महापालिका

> नागरिकांकडून मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद हा महापालिकेच्या विश्वासार्हतेचा आणि पारदर्शक कामकाजाचा पुरावा आहे. वेळेत कर भरणाऱ्यांसाठी ही सवलत एक सन्मानच आहे. तथापी थकबाकीदारांवर विलंब दंड आकारणी व जप्ती कारवाई करण्यात येते त्यामुळे थकबाकीदारांनी लवकरात लवकर ऑनलाइन कर भरुन कारवाई टाळावी.
> - अविनाश शिंदे, सहायक आयुक्त, महापालिका

# खासगी रुग्णालयांकडून डेंग्यू रुग्णांची माहिती देण्यास टाळाटाळ?


## प्रत्यक्षात, जून आणि जुलै महिन्यात महापालिकेकडे डेंग्यूच्या केवळ 15 रुग्णांची नोंद झाली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पावसाळा सुरू होताच पुण्यात कीटकजन्य आजारांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. खासगी रुग्णालयांच्या बाह्यरुग्ण विभागात डेंग्यूच्या संशयित रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. प्रत्यक्षात, जून आणि जुलै महिन्यात महापालिकेकडे डेंग्यूच्या केवळ 15 रुग्णांची नोंद झाली आहे. डेंग्यू 'नोटिफायेबल डिसीज' असतानाही खासगी रुग्णालये नोंदणीस टाळाटाळ करत असल्याचे आकडेवारीवरुन दिसून येत आहे.

डेंग्यू, चिकुनगुनियासारख्या किटकजन्य आजारांवर नियंत्रण आणण्यासाठी महापालिकेने वॉर्डस्तरीय तपासण्या, धूरफवारणी मोहीम राबवली आहे. डेंग्यूच्या एलिझा चाचणीसाठी खासगी रुग्णालयांनी 600 रुपयांचा दर निश्चित केला आहे. याबाबत खासगी रुग्णालयांना नोटीसही पाठवण्यात आली आहे. रुग्णालयांनी जास्त कर आकारल्यास महापालिकेकडे तक्रार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कमला नेहरु रुग्णालयातील मशीनची तातडीने दुरुस्ती करुन कार्यान्वित केले जाईल, अशी माहिती डॉ. बोराडे यांनी दिली. आशा स्वयंसेविकांना घरोघरी जाऊन तपासणी करण्याचे काम सोपवण्यात आले आहे. प्राथमिक चाचणीसाठी लागणा-या किटही देण्यात आल्या आहेत.

प्रत्यक्षात, जून आणि जुलै महिन्यात महापालिकेकडे डेंग्यूच्या केवळ 15 रुग्णांची नोंद झाली आहे. डेंग्यू 'नोटिफायेबल डिसीज' असतानाही खासगी रुग्णालये नोंदणीस टाळाटाळ करत असल्याचे आकडेवारीवरुन दिसून येत आहे. किटकजन्य आजारांची माहिती देणे बंधनकारक असतानाही रुग्णांची गर्दी, मनुष्यबळाचा अभाव अशी कारणे खासगी रुग्णालयांकडून दिली जात आहेत. प्रत्येक रुग्णालयात जाऊन माहिती घेणे महापालिकेला शक्य नाही, त्यामुळे पोर्टलमध्ये रुग्णालयांनी अचूक आणि अद्ययावत माहिती भरल्यास त्यानुसार प्रतिबंधक उपाययोजना राबवणे महापालिकेला शक्य होणार आहे.




### कमला नेहरु रुग्णालयातील डेंग्यू चाचणी मशीन बंद

**महापालिकेचे कमला नेहरू रुग्णालय व गाडीखाना रुग्णालयात मोफत डेंग्यू चाचणीची सोय उपलब्ध आहे. मात्र, कमला नेहरु रुग्णालयातील एलिझा चाचणीचे मशीन बंद आहे. त्यामुळे सध्या केवळ गाडीखाना येथे तपासण्या होत आहेत. कमला नेहरु रुग्णालयातील मशीनची तातडीने दुरुस्ती करुन कार्यान्वित केले जाईल, अशी माहिती डॉ. बोराडे यांनी दिली. आशा स्वयंसेविकांना घरोघरी जाऊन तपासणी करण्याचे काम सोपवण्यात आले आहे. प्राथमिक चाचणीसाठी लागणा-या किटही देण्यात आल्या आहेत.**

> **खासगी रुग्णालये आणि प्रयोगशाळांनी डेंग्यू पॉझिटिव्ह रुग्णांची माहिती महापालिकेकडे सादर करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. राज्य शासनानेही डेंग्यू चाचणीसाठी 600 रुपयांचा दर निश्चित केला आहे. काही ठिकाणी अधिक शुल्क आकारले जात असल्याचे निदर्शनास आल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.**
>
> **- डॉ. निना बोराडे, आरोग्य प्रमुख, पुणे महापालिका**

> **डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवा आणि साचलेले पाणी काढून टाका, जेणेकरून डासांची उत्पत्ती रोखता येईल. डास प्रतिबंधक औषधांचा वापर करणे, मच्छरदाणीमध्ये झोपणे आणि पूर्ण बाह्यांचे कपडे घातल्यास डेंग्यू आणि चिकनगुनियासारख्या आजारांपासून बचाव होऊ शकतो. प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी संतुलित आहार घेणे आवश्यक आहे.**
>
> **- डॉ. प्रतीक अग्रवाल, कन्सल्टंट, पेडियाट्रिक गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट**

# राज्यातील लक्षवेधी ठरलेला पुणे-मिरज रेल्वे दुहेरी मार्ग कार्यन्वित

## शिंदवणे घाटमाथ्यावरून दुहेरी रेल्वे धावल्या, 16 तीव्र वळणे आणि 13 छोटे पूल उभारण्यात आले.

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील लक्षवेधी ठरलेला पुणे-मिरज मार्गावरील पुरंदर तालुक्याच्या जयाद्री खोऱ्यातील पुणे-कोल्हापूर मिरज दुहेरी रेल्वे मार्ग आता कार्यन्वित झाला असून शिंदवणे घाट माथ्यावरून केंद्रीय रेल्वे विभागाच्या परिश्रमातून उभारलेल्या दुहेरी मार्ग आणि दुहेरी बोगद्यातून आता रेल्वे धावू लागल्या आहेत. पुणे-सातारा 145किमी मार्गाचे काम पूर्ण पूर्ण झाले आहे.

मध्यरेल्वे विभागाला आव्हात्मक ठरलेला जयाद्री खोऱ्यातील शिंदवणे घाट माथ्यावरले कठीण काम पूर्ण करण्यात यश मिळाले असून हे काम भौगोलिक द्दष्टीने कठीण होते; परंतु प्रगतीशील भारतीय उत्तम रेल्वे तंत्र आणि कौशल्य यामुळे हा मार्ग उभारला गेल्याचे प्रत्यक्षदर्शी आणि सामाजिक कार्यकर्ते प्रकाशराजे कुंजीर यांनी सांगितले.

शिंदवणे घाट माथ्यावरून केंद्रीय रेल्वे विभागाच्या परिश्रमातून उभारलेल्या दुहेरी मार्ग आणि दुहेरी बोगद्यातून आता रेल्वे धावू लागल्या आहेत. पुणे-सातारा 145किमी मार्गाचे काम पूर्ण पूर्ण झाले आहे. या दुहेरी कारणामुळे रेल्वे गाड्या वेळेवर धावणार असून मार्गांवरील जेजुरी-लोणंद मार्गांवरील वाढते औद्योगिककरण परिसरातील पर्यटन आणि तीर्थक्षेत्रे पाहता मालगाड्याची संख्या ही वाढविण्यात येत असल्याचे संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले. राज्यातील तीर्थक्षेत्र आणि पर्यटन नगरी जेजुरी रेल्वे स्थानकाचा कायपालट होत असून लवकरच या स्थानकात सर्व लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्यांना थांबा आणि एखाद्या एक्स्प्रेस गाडीला जयाद्री अथवा मल्हार एक्स्प्रेस नाव मिळणार असून याबाबत जेजुरी रेल्वे प्रवासी संघटना, श्री मार्तंड देवसंस्थान, ग्रामस्थ भाविक पर्यटक उद्योजक आणि विविध पक्ष्याच्या कार्यकर्त्यांनी केंद्रीय रेल्वे मंत्रालयाशी निवेदनही दाखल केले असल्याचे जेजुरी भाजपा मंडल अध्यक्ष सचिन पेशवे यांनी सांगितले.



### 16 तीव्र वळणे, 13 छोटे पूल

**» पुरंदर तालुक्याच्या जयाद्री खोऱ्यातील पुणे-कोल्हापूर मिरज दुहेरी रेल्वे मार्ग आता कार्यन्वित झाला असून घाट माथ्यावरून दुहेरी मार्ग आणि दुहेरी बोगद्यातून आता रेल्वे धावू लागल्या आहेत. रेल्वे सुरक्षा आयुक्तांनी 17 जून 2025 रोजी तपासणी केल्यानंतर दुहेरी मार्गांवर रेल्वे वाहतूक सुरू करण्यात आली. शिंदवणे, आंबळे दरम्यान काम पूर्ण करण्यासाठी 140 मीटर लांबीचा एक बोगदा बांधला तीव्र उतार असल्याने अचूक योजना अखण्यात आले. 13 भागात विभागलेला पूल बांधण्यात आला. हा पूल एक वर्षात पूर्ण करण्यात आला. 16 तीव्र वळणे आणि 13 छोटे पूल उभारण्यात आले.**